आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१९ सप्टेंबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- काश्मीरमध्ये प्रथमच दहशतवादाची भीती न बाळगता मतदान झाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं श्रीनगरमधल्या प्रचारसभेत प्रतिपादन

- हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाचं संकल्प पत्र जाहीर, महिलांना दरमहा एकवीसशे रुपये आणि कुटुंबांना १० लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार देण्याचं आश्वासन

- अमेरिकी फेडरल रिझर्व्हकडून ४ वर्षानंतर पहिल्यांदाच व्याजदरात कपात, जगभरातले शेअर बाजार तेजीत

- आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या अभ्यास परवान्यांमध्ये कपात करण्याचा कॅनडाचा निर्णय

**आणि**

- बांगलादेशविरुद्धच्या क्रिकेट कसोटी मालिकेच्या पहिल्या सामन्यात भारताची खराब सुरुवात

**<><><><><>**

जम्मू काश्मीर मध्ये सध्या लोकशाहीचा उत्सव सुरू असून पहिल्यांदाच दहशतवादाची भिती न बाळगता मतदान झालं, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. जम्मू काश्मीरमधल्या विधानसभा

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज श्रीनगरमधल्या प्रचारसभेला संबोधित करताना ते बोलत होते. केंद्रशासीत प्रदेशात मोठ्या प्रमाणात मतदान झाल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी समाधान व्यक्त केलं. जम्मू काश्मीरची जनता देशाच्या लोकशाहीला बळकट करत आहे, असंही ते म्हणाले. प्रधानमंत्री संध्याकाळी कतरा आणि वैष्णो देवीच्या बेस कॅम्पमध्ये प्रचारसभा घेणार आहेत. त्याआधी प्रधानमंत्र्यांनी डोडा इथल्या सभेला संबोधित केलं. सरकारनं मागच्या काही दिवसात जम्मू काश्मीरमध्ये केलेल्या विकासकामांची उजळणी त्यांनी यावेळी केली. दरम्यान, जम्मू काश्मीरमध्ये दहा वर्षांनंतर विधानसभेची निवडणूक होत आहे. ही निवडणूक तीन टप्प्यात होत असून पहिल्या टप्प्यातलं मतदान काल शांततेत पार पडलं.

<><><><><>

जम्मू काश्मिर विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात ३५ वर्षातल्या सर्वाधिक ६१ टक्के मतदानाची नोंद झाली. सर्व २४ मतदारसंघात काल शांततेत मतदान झालं. किश्तवाड जिल्ह्यात सर्वाधिक ८० टक्के मतदानाची नोंद झाली आणि पुलवामामध्ये सर्वात कमी सुमारे ४७ टक्के मतदान झालं. युवा आणि महिला मतदार मोठ्या संख्येनं या मतदानात सहभागी झाले होते. बहिष्कार आणि दहशतवादाला मतदारांनी मतदान यंत्रातून उत्तर दिल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. जम्मू-काश्मिरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी निवडणूक प्रक्रियेतल्या या विक्रमी सहभागाबद्दल मतदारांचं अभिनंदन केलंय.

<><><><><>

हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठीचं संकल्प पत्र भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी आज रोहतकमध्ये प्रसिद्ध केलं. लाडकी बहिण योजनेच्या धर्तीवर महिलांना दरमहा २ हजार १०० रुपये देण्याचं आश्वासन सरकारनं यात दिलंय. सर्व कुटुंबांना १० लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार आणि ७० वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्यांना अतिरीक्त ५ लाख रुपयांचे उपचार मोफत देण्याचं आश्वासन यात आहे. १० औद्योगिक शहरांची निर्मिती आणि प्रत्येक शहरात ५० हजार स्थानिक युवकांना रोजगार देण्याचं आश्वासन भाजपानं दिलंय. तसंच २ लाख युवकांना कुठल्याही वशिल्याशिवाय सरकारी नोकरी आणि ५ लाख युवकांना अप्रेंटिसशिप द्यायचं आश्वासनही यात आहे. २४ पीकांची किमान आधारभूत किंमतीवर खरेदी, शहरी आणि ग्रामीण भागात ५ लाख घरं, गृहिणींना ५०० रुपयात सिलिंडर यासारखी अनेक आश्वासन यात आहेत.

<><><><><>

संस्कृती आणि नागरीकरणाची परंपरा अनेक शतकांपासून उज्जैनमध्ये अस्तित्वात होती, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. उज्जैनमध्ये आज सफाई मित्र संमेलनाला त्यांनी संबोधित केलं. उज्जैन - इंदूर ६ पदरी महामार्गाचं आभासी माध्यमातून त्यांनी भूमीपूजनही केलं. गेल्या १० वर्षात स्वच्छता अभियान राष्ट्रव्यापी झालं असून त्यातून देशात मोठे बदल दिसून

आल्याचं त्या म्हणाल्या. मध्य प्रदेशातली अनेक शहरं सफाई मित्र सुरक्षित शहरं म्हणून जाहीर झाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

<><><><><>

केंद्र सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातल्या पहिल्या शंभर दिवसांत सहकार मंत्रालयाने सुरू केलेल्या योजना आणि धोरणांविषयी माहिती देण्यासाठी केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा आज नवी दिल्लीत राष्ट्रीय परिषदेला संबोधित करणार आहेत. या शंभर दिवसांत सहकार क्षेत्रासाठी अनेक महत्वाची पावलं उचलण्यात आली, यामुळे सहकार व्यवस्थेला नव्या ताकदीने आणि गतीने पुढे जायला मदत होईल, असं शहा आपल्या समाजमाध्यमावरल्या पोस्टमध्ये म्हणाले.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहेत. ते वर्धा इथं पीएम विश्वकर्मा कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. यावेळी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र आणि कर्ज वाटप करतील. या योजनेच्या एक वर्षाच्या यशस्वी पूर्ततेसाठी ते पोस्टाच्या तिकिटाचं अनावरणही करणार आहेत.

त्यानंतर ते अमरावती इथं पीएम मित्रा अर्थात पीएम मेगा इंटेग्रेटेड टेक्स्टाईल रिजन्स अँड ऍपरल पार्कची पायाभरणी करतील. या एक हजार एकरवर पसरलेल्या पार्कची निर्मिती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून

करण्यात येत आहे. केंद्र सरकारने वस्त्रोद्योगासाठी सात पीएम मित्रा पार्कला मान्यता दिली आहे. प्रधानमंत्री मोदी राज्य सरकारच्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचं उद्घाटन करणार आहेत. १५ ते ४५ वयोगटातल्या तरुणांना प्रशिक्षण देण्यासाठी, रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यभरातल्या नामांकित महाविद्यालयामध्ये ही केंद्र स्थापन करण्यात येत आहेत. त्यानंतर प्रधानमंत्री पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजनेचंही अनावरण करणार आहेत.

**<><><><><>**

अमेरिकी फेडरल रिझर्व्हनं ४ वर्षानंतर पहिल्यांच व्याजदरात कपात केली आहे. बँकेनं त्यांच्या व्याजदरात अर्धा टक्क्याची कपात करुन हा दर पावणे ५ ते ५ टक्क्यांच्या दरम्यान नेला आहे.  फेडरल ओपन मार्केट समितीच्या २ दिवस चाललेल्या बैठकीनंतर अध्यक्ष जेरोम पॉवेल यांनी हा निर्णय जाहीर केला. महागाई आटोक्यात आल्यानं आणि बेरोजगारीची भीती वाढल्यानं ही कपात आवश्यक असल्याचं पॉवेल म्हणाले. व्याजदरात अपेक्षेपेक्षा अधिक कपात झाल्यानं जगभरातले शेअर बाजार तेजीत होते. भारतीय शेअर बाजारांनीही आज व्यवहार सुरू झाल्यानंतर विक्रमी पातळीला स्पर्श केला होता.

**<><><><><>**

आपल्या देशातले तात्पुरत्या रहिवाशांच्या संख्येचं व्यवस्थापन व्हावं या हेतूने कॅनडाने आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या अभ्यास परवान्यांमध्ये कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. इमिग्रेशन, रिफ्युजीस अँड सिटिझनशिप कॅनडाने काल वार्ताहरांना ही माहिती दिली. पुढच्या वर्षी नवीन आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अभ्यास परवान्यांमध्ये यंदा पेक्षा १० टक्के कपात केली जाणार आहे.

**<><><><><>**

मंगळवारी आणि बुधवारी लेबननमध्ये झालेल्या स्फोटात किमान ३२ जणांचा मृत्यू झाला आहे. बैरुत आणि इतर ठिकाणी पेजर आणि वॉकी-टॉकीमध्ये हे स्फोट झाले. हिजबुल्ला ही उपकरणं वापरत होती. परवा पेजरच्या स्फोटात १२ जणांचा मृत्यू आणि सुमारे ३ हजार जण जखमी झाले होते. या स्फोटातल्या मृतांवर अंत्यसंस्काराच्या ठिकाणी काल वॉकी टॉकीच्या स्फोटात २० जण ठार झाले आणि साडे चारशे जण जखमी झाले होते. पेजरची निर्मिती केलेल्या तैवानी आणि हंगेरीच्या कंपनीने यात कुठलाही सहभाग नसल्याचं स्पष्ट केलंय. या हल्ल्यामागे इस्राइलचा हात असल्याचा आरोप जॉर्डनचे परराष्ट्र मंत्री आयमान सफदी यांनी केला आहे.

**<><><><><>**

बांग्लादेशाविरुद्धच्या कसोटी मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताची खराब सुरुवात झाली. चेन्नईच्या चिदंबरम स्टेडियमवर हा सामना सुरू

आहे. बांगलादेशनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ४ गडी बाद १३६ धावा झाल्या होत्या. ४ पैकी ३ फलंदाज १० पेक्षा कमी धावांवर बाद झाले. यात विराट कोहली, रोहित शर्मा, शुभमन गिल या दिग्गजांचा सहभाग आहे. रिषभ पंत फक्त ३९ धावा काढू शकला. हसन महमूदनं अवघ्या २५ धावात हे चारही गडी टिपले आहेत. गौतम गंभीर भारतीय संघाचा प्रशिक्षक झाल्यानंतर भारताची ही पहिलीच कसोटी मालिका आहे.

**<><><><><>**

४५ व्या बुद्धीबळ ऑलिम्पियाडमध्ये भारताने चीनला काल खुल्या सत्राल्या सातव्या फेरीत पराभूत केलं. डी गुकेश याने वेई यी याला हरवत भारताचा सातव्या फेरीतला विजय निश्चित केला. चीनवर विजय मिळवल्यानंतर खुल्या सत्रात भारताच्या खात्यात १४ गुण जमा झाले आहेत. खुल्या आणि महिला गटात भारताच्या दोन्ही संघांनी बुद्धीबळ ऑलिम्पियाडच्या उत्तरार्धात एकही सामना न गमावता प्रवेश मिळवला आहे.

**<><><><><>**

**सूक्ष्म, लघू** आणि मध्यम उद्योगांसाठी तेलंगणानं काल नवीन MSME धोरण जाहीर केलं. याअंतर्गत येत्या ५ वर्षात ४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. या मुळे दलित, महिला यांच्यासह MSME ला प्रोत्साहन मिळेल, असं मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी म्हणाले.

**<><><><><>**

पुढच्या तीन दिवसांत उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि मध्य प्रदेशात मुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. तर छत्तीसगड, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुराच्या विविध भागांमध्ये येत्या २४ सप्टेंबर पर्यंत मुसळधार पावसाची शक्यता आहे. येत्या आठवड्यात कोकण आणि गोव्यात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस होईल, असा अंदाजही हवामान विभागानं वर्तवला आहे.

**<><><><><>**

मुंबईमध्ये डीप क्लिन ड्राईव्हच्या माध्यमातून रस्ते साफ करणं, रस्ते झाडणे, पाण्याने रस्ते धुणं हे काम सुरू असून यामुळे मुंबईचं प्रदुषण कमी झालं असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

**//<><><><><>//**